# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/02/2024 (बुधवार) दुपार


---

### दंगा करून गैरकायदयाची मंडळी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर भाईजी कॉम्प्लेक्स तहसील कार्यालयचे मागे परसोडी उमरेड येथे दिनांक ०६/०२/२०२४ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— तबस्सूम सलिमखान पठाण, वय ४४ वर्षे, रा. भाईजी कॉम्प्लेक्स तहसील कार्यालयाचे मागे परसोडी उमरेड व **आरोपी नामे—१) मेहमुद बानो हबीबखान पठाण वय ७० वर्षे. २) तन्वी उर्फे यूक्ती जावेद पठाण, वय ४२ वर्षे ३) शहनाज अलीमखान पठाण वय ४३ वर्षे ४) गजाला शकिल पठाण वय ३८ वर्षे ५) अलिमखान हबीबखान पठाण वय ४८ वर्षे. ६) जावेदखान हबीबखान पठाण वय ४३ वर्षे. ७)माहीन अलीमखान पठाण वय २१ वर्षे. सर्व रा. भाईजी कॉम्प्लेक्स तहसील कार्यालयचे मागे परसोडी** हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. फिर्यादी यांचे राहते घरी यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमा करून फिर्यादीचे घरात घुसुन तु जावेदखान ला बॅकेत काय बोलली तसेच रेल्वे मध्ये गेलेल्या जमिनीचे पैशाचे कारणावरून फिर्यादीस हाथबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व जीवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५२, १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर घटनास्थळी पोउपनि दिनेश खाटेले यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश खोटेले पोस्टे उमरेड हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर अरविंद इंन्डोखुटाबा रोड काटोल येथे दिनांक १९/०१/२०२४ चे १०.३० वा. ते १०.३५ वा. दरम्यान यातील मृतक हे फिर्यादीचे आजोबा सुर्यभान रोडबाजी रेवतकर असुन दि. १९/०१/२०२४ चे १०/३० वा. दरम्यान लता मंगेशकर हॉस्पीटल खुटांबा रोड काटोल येथुन सायकलने शेतात जात असतांना अरविद इंन्डो पब्लीक स्कुल जवळ मागुन येणाऱ्या कोणत्यातरी अज्ञात मोटार सायकल चालकाने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे आजोबांचे सायकलला मागुन धडक मारून गंभिर जखमी केल्याने त्याचे लता मंगेशकर हॉस्पीटल डिगडोह नागपुर येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अक्षय विजय रेवतकर, वय २४ वर्ष, रा. मरामाय नगर काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक गोगले यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोगले पोस्टे काटोल मो. नं. ७४९८५२६३८४ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर